क्र.साप्रवि/गट-८(रवका)/सा.आ./११७(क)/
म.भत्ता/नस्ती क्र.५६९/
महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत
प्लॉट क्र.१,तळमजला,धारावी रोड
माटुंगा,मुंबई - ४०० ०१९.

## सुधारपत्र क्रमांक ३२ दिनांक २९/०६/२००४
### (सर्वसाधारण आदेश क्र.११७ (क) दिनांक ३१.३.१९८६ करिता)

विषय : म.रा.वि.मंडळाच्या कर्मचा-यांना दिनांक १.६.२००४ पासून महागाई भत्ता वाढ देण्याबाबत.

वाचा : १) स.सा.आ.क्र.११७ (क) दिनांक ३१.३.८६
२) स.सा.आ.क्र.१५२ (क) दिनांक १०.१.२००१ व
स.सा.आ.क.१५३ (क) दिनांक १०.१.२००१
३) स.सा.आ.क्र.११७ (क) दिनांक ३१.३.८६ चे
सुधारपत्र क्र.२९ दिनांक २/२/२००२,
सुधारपत्र क्र.३० दिनांक ६/६/२००२ व
सुधारपत्र क्र.३१ दिनांक १७/९/२००३
,,,,,,,,

महाराष्ट्र शासनाने निर्णय क्र.वित्त विभाग क्र.मभवा-११०३/प्र.क्र.१४/सेवा/९ दिनांक १०.६.२००४ अन्वये शासनाच्या सर्व कर्मचा-यांना दिनांक १.६.२००४ पासून वेतनश्रेणीतील मूळ वेतनाच्या ५५ % ऐवजी ६१ % या सुधारित दराने महागाई भत्ता मंजूर केला आहे.

२. शासनाच्या धर्तीवर मंडळाच्या कर्मचा-यांना सुध्दा उपरोक्त दराने महागाई भत्ता देण्याबाबत सक्षम अधिकारी मा.अध्यक्ष यांनी मंजूरी दिली आहे.

३. महागाई भत्त्याची रक्कम प्रदान करण्यासंबंधात विद्यमान तरतूदी व कार्यपध्दती आहे तशाच यापुढेही लागू राहतील.

४.  सुधारीत दरानुसार महागाई भत्त्याचे प्रदान मंडळाच्या सर्व कर्मचा-यांना जुलै २००४ च्या वेतनातून लागू करण्यात यावा. तसेच जून २००४ या महिन्याच्या थकबाकीची रक्कम जुलै २००४ महिन्याच्या पगारासोबत द्यावी.

५.  संबंधित अधिका-यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी महागाई भत्त्याची वाढीव रक्कम प्रदान करण्यासाठी आवश्यक असलेल्या निधीची मागणी श्री.व्ही.आर.शिरुरकर, सह मुख्य लेखाधिकारी (अर्थोपाय विभाग), हाँगकाँग बँक बिल्डींग, ४ था माळा, मुंबई - ४०० ०२३ यांचेकडे त्वरीत करावी.

(सु.य.पाटील)
संचालक (कर्मचारीवर्ग)

प्रत :-
प्रेषण यादीप्रमाणे कार्यकारी अभियंता, तत्सम व त्यावरील दर्जाच्या अधिका-यापर्यंत माहितीसाठी.